**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 अहमदनगर मनपाच्या वतीने मतदानासाठी बलून द्वारे जनजागृती..**

आय विटनेस

# मतदान जागृतीसाठी हवेत सोडला बलून....




महापालिकेतर्फे मतदान जागृतीसाठी बलून हवेत सोडण्यात आला. यावेळी आयुक्त डॉ. पंकज जावळे व अधिकारी. असे बलून नगर शहराच्या विविध भागातून हवेत सोडण्यात येणार आहे.

# जास्तीत जास्त मतदान घडवून आणू : जावळे

## मनपातर्फे बलूनद्वारे मतदार जागृती

अहमदनगर, ता. ७ : लोकशाहीचे मूल्य वृद्धिंगत करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजवावा. यात नाव मतदार यांनी पुढे येवून राष्ट्रीय कर्तव्य बजवावे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी सर्वच मतदारांनी यात सहभाग नोंदवावा. सर्व मिळून चांगले मतदान घडवून आणू, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले.




**अहमदनगर :** महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीवरील मतदान जागृती बलूनची पाहणी करताना आयुक्त डॉ. पंकज जावळे व अधिकारी.

लोकसभा निवडणुकीसाठी येत्या १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन पूर्ण करायचे आहे. त्यासाठी अहमदनगर मनपाच्यावतीने विविध उपक्रम राबवत नागरिकांमध्ये मतदानासाठी जनजागृती करण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी नगर शहरातील विविध भागात बलूनद्वारे मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. प्रशासकीय इमारतीवर लावण्यात आलेल्या बलूनची आयुक्त डॉ. जावळे यांनी पाहणी केली. यावेळी अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये मतदान ५० टक्केहून कमी झालेल्या नगर शहरातील १४ ठिकाणी गृहफेरी काढण्यात येत आहे. त्यासाठी ४२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. ते दररोज या भागात नागरिकांच्या घरोघरी जाऊन नागरिकांमध्ये विविध उपक्रमातून जनजागृती करण्यात येत आहे.

केलेल्या दैनदिन कामाचा अहवाल मागवला जात आहे. शहरात ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन यशस्वी करू.

### मी मतदान केले

'माय वोट माय राईट' या संकल्पनेनुसार आज मी सोलापूर शहरात जावून लोकसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला. प्रशासकीय जबाबदारी पार पडत असतानाच राष्ट्रीय मुलभूत कर्तव्य पार पाडले. पुन्हा प्रशासकीय जबाबदारीसाठी कर्तव्यावर हजर झालो, सर्व नागरिकांनी देखील वेळात वेळ काढत आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन डॉ. पंकज जावळे यांनी केले.

# ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन यशस्वी करू: जावळे




**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीसाठी येत्या १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन पूर्ण करायचे असून त्यासाठी अहमदनगर मनपाच्या वतीने विविध उपक्रम राबवत नागरिकांमध्ये मतदानासाठी जनजागृती करण्यात आली, त्याचाच एक भाग म्हणून १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी नगर शहरातील विविध भागात बलूनद्वारे मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली, लोकशाहीचे मुल्य वृद्धिंगत करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजवावा यात नाव मतदार यांनी पुढे येवून राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी सर्वच मतदारांनी यात सहभाग नोंदवावा, नागरिकांमध्ये जास्तीत जास्त रुजवण्याचे काम करणाऱ्याना पुरस्कार वितरीत करण्यात येणार आहे असे मत मनपा आयुक्त

**माय वोट माय राईट या संकल्पनेनुसार आज मी सोलापूर शहरात जावून लोकसभ निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला, प्रशासकीय जबाबदारी पार पडत असतानाच राष्ट्रीय मुलभूत कर्तव्य पार पाडले आणि पुन्हा प्रशासकीय जबाबदारीसाठी कर्तव्यावर हजर झालो, सर्व नागरिकांनी देखील वेळात वेळ काढत आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन अहमदनगर मनपाचे आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले.**

डॉ. पंकज जावळे यांनी केले.मतदानाच्या जनजागृतीसाठी अहमदनगर मनपाच्या वतीने प्रशासकीय इमारतीवर लावण्यात आलेल्या बलूनची आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी पाहणी केली. यावेळी उपायुक्त साताळकर, उपायुक्त पवार, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, शेखर देशपांडे आदी उपस्थित होते.

## शहरात मतदान जनजागृतीसाठी गृहफेरी

**लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये मतदान ५० टक्केहून कमी झालेल्या नगर शहरातील १४ ठिकाणी गृहफेरी काढण्यात येत असून त्यासाठी ४२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे, ते दररोज या भागात नागरिकांच्या घरोघरी जाऊन नागरिकांमध्ये विविध उपक्रमातून जनजागृती करण्यात येत आहे व केलेल्या दैनंदिन कामाचा अहवाल मागवला जात असून शहरात ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन यशस्वी करू असे मत आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी व्यक्त केले.**

# मनपातर्फे बलूनद्वारे मतदान जनजागृती

## ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन यशस्वी करू : आयुक्त डॉ. जावळे

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीसाठी येत्या १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन पूर्ण करणार आहोत. त्यासाठी अहमदनगर मनपाच्या वतीने शहरातील विविध भागात बलूनद्वारे मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली.

लोकशाहीचे मुल्य वृद्धिंगत करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजवावा यात नाव मतदार यांनी पुढे येऊन राष्ट्रीय कर्तव्य बजवावे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी सर्वच मतदारांनी यात सहभाग नोंदवावा. नागरिकांमध्ये जास्तीत जास्त रुजवण्याचे काम करणाऱ्याना पुरस्कार वितरीत करण्यात येणार आहे, असे मत मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले. मतदानाच्या जनजागृतीसाठी अहमदनगर मनपाच्या वतीने प्रशासकीय इमारतीवर लावण्यात आलेल्या बलूनची आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी पाहणी केली. यावेळी उपायुक्त साताळकर, उपायुक्त पवार, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, शेखर देशपांडे आदी उपस्थित होते.



**नगर : सोलापूर शहरात मंगळवारी मतदान करून आयुक्त डॉ. जावळे पुन्हा कर्तव्यावर हजर झाले.**

> माय वोट माय राईट या संकल्पनेनुसार आज मी सोलापूर शहरात जाऊन लोकसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला. प्रशासकीय जबाबदारी पार पडत असतानाच राष्ट्रीय मूलभूत कर्तव्य पार पाडले आणि पुन्हा प्रशासकीय जबाबदारीसाठी कर्तव्यावर हजर झालो. सर्व नागरिकांनी देखील वेळात वेळ काढत आपला मतदानाचा हक्क बजावावा.
>
> **- डॉ. पंकज जावळे,**
> आयुक्त, महापालिका, अहमदनगर

दिव्य मराठी

अहमदनगर सिटी 08-05-2024

**उत्सव लोकशाहीचा** • बलून द्वारे मतदार जागृती, ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन यशस्वी करू : आयुक्त

# कमी मतदान झालेल्या १४ ठिकाणी गृहफेरी

प्रतिनिधी | नगर

लोकसभा निवडणुकीसाठी १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये मतदान ५० टक्क्यांहून कमी झालेल्या नगर शहरातील १४ ठिकाणी गृहफेरी काढण्यात येत आहे. त्यासाठी ४२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे, ते दररोज या भागात नागरिकांच्या घरोघरी जाऊन नागरिकांमध्ये विविध उपक्रमातून जनजागृती करण्यात येत आहे व केलेल्या दैनंदिन कामाचा अहवाल मागवला जात आहे.

जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन पूर्ण करायचे आहे. त्यासाठी अहमदनगर मनपाच्या वतीने विविध उपक्रम राबवत नागरिकांमध्ये मतदानासाठी जनजागृती करण्यात आली, त्याचाच एक भाग म्हणून १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी नगर शहरातील विविध भागात बलूनद्वारे मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. लोकशाहीचे मूल्य वृद्धिंगत करण्यासाठी नागरिकांनी जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजवावा यात नाव मतदार यांनी पुढे येऊन राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी सर्वच मतदारांनी यात सहभाग नोंदवावा, नागरिकांमध्ये जास्तीत जास्त रुजवण्याचे काम करणाऱ्यांना पुरस्कार वितरीत करण्यात येणार आहे.शहरात ७५ टक्के मतदान घडवण्याचे मिशन यशस्वी करू,असे मत आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी व्यक्त केले.



मनपाच्या वतीने मतदानासाठी बलून द्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

मतदानाच्या जनजागृतीसाठी अहमदनगर मनपाच्या वतीने प्रशासकीय इमारतीवर लावण्यात आलेल्या बलूनची आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी पाहणी केली. यावेळी उपायुक्त साताळकर, उपायुक्त पवार, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, शेखर देशपांडे आदी उपस्थित होते. आयुक्त डॉ. जावळे म्हणाले, माय वोट माय राईट या संकल्पनेनुसार आज मी सोलापूर शहरात जाऊन लोकसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला, प्रशासकीय जबाबदारी पार पडत असतानाच राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले आणि पुन्हा प्रशासकीय जबाबदारीसाठी कर्तव्यावर हजर झालो, सर्व नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन आयुक्त डॉ. जावळे यांनी केले.

लोकमत

पॉलि-क्लिक

# पुन्हा कर्तव्यावर हजर..



अहमदनगर महापालिकेचे आयुक्त डॉ. पंकज जावळे यांचे सोलापूर शहरात मतदान आहे. मंगळवारी तिसऱ्या टप्प्यात सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होते. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जावळे हे मंगळवारी पहाटेच पत्नी प्रेरणा यांच्यासमवेत सोलापुरात दाखल झाले. तेथे मतदान करून दुपारी बारापर्यंत पुन्हा मनपात कर्तव्यावर हजर झाले.